23/08/2024, 13:56 IMG-20230826-WA0019 - Dilip Peshwe.jpg

# स्त्रियांच्या लोकसाहित्याचे स्वरूप

प्रा. विद्या चं. मांडवेकर
सहाय्यक प्राध्यापक,
मराठी विभाग कमला नेहरू महाविद्यालय, नागपूर

**प्रस्तावना :** स्त्रियांच्या लोकाहित्याचे स्वरूप लक्षात घेतांना, स्त्रिनिर्मित कथा-गीतांचा पसारा उदंड आहे. स्त्रियांच्या साहित्याचा खुप मोठा व्याप हा स्त्रीप्रतिभेचा अविश्कार आहे. स्त्री-गीते आणि कहाण्या हे लोकसाहित्य आहे, ही व्याप्ती थोडी अधिक वाढणारी आहे आणि परंपरेने आलेल्या म्हणी वाक्प्रचार विविध उखाणे, कुट-कोडी यांचा समावेश लोकसाहित्यात केला जातो. हे योग्यच आहे परंतु लोकसाहित्याची व्याप्ती याहूनही विस्तृत आहे. या सर्व भाषिक, शब्दबद्ध किंवा शाब्द सामग्री बरोबरच पिढ्यानपिढ्या लोकपरंपरेतून आपोआप निर्माण झालेल्या लोकस्मृतीने जतन केलेल्या आणि लोकपरंपरेतुन आपोआप निर्माण झालेल्या, लोकस्मृतीने जतन केलेल्या आणि लोकाचारांत टिकून राहिलेल्या अनेक घटकांचा लोकसाहित्यात समावेश होतो. लोकचारांतील धार्मिक रीती, परंपरा सामाजिक चालीरिती, रूढी-परंपरा, लोकभ्रम, संगीत, नृत्य, वाहन, नाट्य, आदी सर्व पारंपारिक कला, लोकज्योतिष, चित्रकला, हस्तकला, कारागिरी, लोकसमाज या सर्वांचा समावेश लोकसाहित्यात होतो. लोकसाहित्याची ही व्याप्ती सर्व क्षितिजांना सामावून घेणारी आहे.

लोकसाहित्यातील सर्वात विस्तृत व भावगर्भ दालन म्हणजे लोकसाहित्यातील स्त्रीगीते, स्त्रीयांकडून लोकसाहित्यांचे जतन फार मोठ्या प्रमाणात केल्या गेले. भारतामध्ये पुरुषप्रधान संस्कृती असल्यामुळे स्त्रीला नेहमीच दुय्यम स्थान देण्यात आले. त्यामुळे स्त्रीच्या आयुष्यामध्ये उद्भवणारी भावनिक आंदोलन अस्वस्थता, सोशीकता, ताण तणाव या सर्वांचा आर्त हुंकार, संवेदनशीलता या स्त्रीगीतांमध्ये प्रामुख्याने दिसून येतो. स्त्रीयांच्या जीवनातील भावनिक, मानसिक, कौटुंबिक व सामाजिक जीवनाचे स्वच्छ प्रतिबिंब या स्त्रीगीतातून झळकते. स्त्रीगीतामधून, आई, पत्नी, मुलगी, सून, सासू अशा विविध नात्याच्या अंगाने स्त्री जीवनाचे दर्शन या गीतामधून होते लोकसाहित्यातील स्त्री गीतामधून स्त्रीचा अहंपणा, काटकता व खंबीरता आढळते. स्त्रीगीतामध्ये माहेर आणि सासर या दोन्ही नात्यांचा जिव्हाळा दिसून येतो. या गीतांमध्ये. पुरुषांच्या जगण्यांची



https://drive.google.com/file/d/1hFnZoZTQ8wgpRKcJxJhK3uwrYDQuZBaZ/view 1/1